Vol 3 Issue 3 Sept 2013

Impact Factor : 1.2018 (GISI)

ISSN No :2231-5063

Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume-3, Issue-3, Sept-2013
ISSN 2231-5063

Available online at www.aygrt.isrj.net

# कृषि परंपरा : एक ज्योर्तिवाद परंपरा

**पी.आर. पुंडकर**
मराठी विभाग प्रमुख, महात्मा फुले महाविद्यालय, वरूड,जि. अमरावती.

***सारांश :***लोकपरंपरा ही मुख्यता मौखिक स्वरूपाची मानली जाते. लोकवाङ्.मयाची परंपरा ही मौखिक असली तरी लोकसाहित्याच्या काही अंगाना लौकिक शास्त्रीय आधार असतो. लौकिक परंपरेत व्यक्तित्वाचा प्रभाव असतो ही लौकिक परंपरा व्यक्तिगत अनुभवजन्म ज्ञानदृष्टी अभिव्यक्त करणारी असते. मौखिक परंपरेप्रमाणेच लौकिकधाराही परंपरेनेच चालत आलेली असते. लौकिक परंपरांच्या मागे बरेचदा लोकोपकाराची भावना असते. लोकोपयुक्त ज्ञान व्यक्तिविशिष्ट पातळीवर असल्याने लोकजीवनात या व्यक्तीना प्रतिष्ठा सुध्दा प्राप्त होते.

## *प्रस्तवाना :*

लोकज्योतिर्वाद ही देखिल व्यक्तीविशिष्ट काम आहे.पारंपरिक हवामान विषयक समजुतीमागे सहदेव भादडीसारख्या लौकिक पातळीवरील व्यक्तीच्या अनुभवजन्य शास्त्रीय ज्ञानाचे पाठबळ असते. भेंडवळच्या कृषिमांडणीत सुध्दा लोक ज्योतिर्विद चंद्रभान महाराजाच्या लोकोत्तर व्यक्तिमत्वाविषयी कमालीची लोकश्रध्दा आढळते, प्रस्तुत ठिकाणी सहाव्या शतकाच्याही आधी असलेल्या ' कृषीपाराशरा ' या संस्कृत ग्रंथाचा मागोवा घ्यायचा आहे.कृषी पाराशर हा मूळ ग्रंथ संस्कृतमध्ये आहे. कृषी पाराशरा हा ग्रंथ वेद, महाभारात आणि अर्थशास्त्र यांच्याशी संबंधित होता. पाराशर हे शेती, खगोलशास्त्र, फल–ज्योतिशशास्त्र आणि हवामानशास्त्र याचे लेखक होते.

## *शेतकरी जगाचा पोशिंदा –*

पराशराच्या मते शेती करणे हा उमदा व्यवसाय आहे कारण या व्यवसायामुळे शेतकरी हा जगाला आणि स्वतःच्या निर्मितीला टिकवून ठेवू शकतो. अनंत अशा प्राण्यांना आणि मानवजातींना अन्नाची गरज असते. ती शेतीमधूनच पूर्ण होऊ शकते. म्हणूनच पाराशरा यांनी ग्रंथाच्या सुरूवातीला शेतक–याला जगाचा पोशिंदा म्हटले आहे. पुढे पाराशर म्हणतात की गरीब आणि श्रीमंत यानी जरी संपत्ती ही सोने, चांदी, जडजवाहीर किंवा दागीने किंवा महागडया कपडयांच्या रूपात संचय केला तरी सुध्दा हे लोक आपले भुकलेले पोट भरण्यासाठी शेतीवरच अवलंबून आहेत. अशा श्रीमंत लोकांना उद्देशून पाराशर म्हणतात श्रीमंत लोकांनी अद्याप असा दुष्टिकोन ठेवला पाहिजे की, शेतकरी हाच एकमेव नियमित अन्नधान्य पुरवठा करणारा किंवा उत्पादनकर्ता म्हणून सहाव्या श्लोकात पाराशर म्हणतात, ' सर्व जीवांना शेती हे पौष्टिक अन्नाचा पुरवठा करणारे उगमस्थान आहे आणि अन्न हे शक्ती देते, देवता, राक्षस, मानव हे अन्नावर अवलंबून आहेत कारण अन्न हे सर्वांना जीवंत ठेवते. शेतक–यांना पाराशर सल्ला देतात की, शेती करणे हा उत्तम व्यवसाय आहे. सर्वच जीवजंतू हे शेतीवर अवलंबून आहेत म्हणून मातीत अतिशय कश्ट मेहनत करून अन्न, धान्य उत्पादन करावे. '

## *अतिथी देवो भव –*

प्राचीन काळी जेंव्हा वाहतुकीची साधन उपलब्ध नव्हती तेंव्हा लोक पायी प्रवास करीत. तेंव्हा प्रवास दरम्यान रस्त्यात माणूस भेटल्यावर त्याचे आदरातिथ्य होत होते. जो कोणी भेट देणारा व्यक्ती कदाचित एखादा परमेश्वराचा दूत असू शकतो कदाचित त्याला परमेश्वराने पाठविले असावे. ही धारणा तेंव्हाच्या मानवाची होती. म्हणून अशा भेट देणा–या व्यक्तीला ' अतिथी ' किंवा पाहुणा म्हणून संबोधल्या जाते ती त्या काळी चालीरिती होती. आजही ही प्रथा खेडयात पाळल्या जाते अशा अतिथिचे आदरातिथ्य मोठया आस्थेने केल्या जाते. पाराशर म्हणतात जर एखादा व्यक्ती पाहुण्याचा आदरातिथ्य करतो अशा व्यक्तीवर सर्वच देवता आपली वंदना आदर करतात.

## *पर्जन्यनिदान –*

ग्रामीण लोकजीवन मुख्यतः शेतीवर अवलंबून असल्याने पर्जन्यनिदान आणि पिकपाणी विषयक अनुमान जाणून घेण्याची उत्कट लालसा शेतक–याच्या ठिकाणी असते. ही लालसा ओळखून पाराशरा यांनी या ग्रंथांत पर्जन्यनिदान केलेले आहे. पाराशर दहाव्या श्लोकात म्हणतात 'सर्वच शेती ही पावसावर अवलंबून आहे.' ' आधाका ' हे प्राचीन भारतात पावसाचे मोजमाप करण्याचे साधन होते. पाराशर हे चार प्रकारच्या ढगाची यादी देतात. आवर्त, सामवर्त, पुष्करा आणि द्रोणा हे चारही एकमेकापासून वेगळे होते. पाराशर यांनी ह्या वेगवेगळया ढगांच्या संबंधावरून पावाचे प्रमाण ठरविले होते.पुढे कौटिल्याच्या अर्थशास्त्रानुसार (4 थ्या शतकापूर्वी ) पावसाचक मोजमाप हे द्रोणातच घेतले जात असे. पाराशर यांनी शेतक–यांना दिलेल्या सल्ल्यानुसार महिन्यात पडणा–या पावसाचे निरिक्षण केले. यासाठी वा–याचे दिशाचक्र एका खांबाद्वारे उभे केलं जात असे त्याच्यावर एक निशान लावले जात असे. पाराशर यांच्या मते उत्तर–पश्चिम वाहणारा वारा पाऊस पाडतो आणि पूर्व दक्षिण वाहणारा वारा हा पावसाचा अभाव दर्शवितो.

पाराशर यांनी पावसाच्या फलज्योतिश्याचे मूल्यमापन आठवडयाच्या सात दिवसावर करतात. उदा. रविवार–सूर्य, सोमवार–चंद्र, मंगळवार–मंगळ, बुधवार–बुध, गुरूवार–गुरू, शुक्रवार–शुक्र, शनिवार–शनी, पाराशर म्हणतात जर वर्षाचा राजा सूर्य अगोदर असेल तर शेतक–यांना पावसाच्या सरासरीची अपेक्षा असते. जर चंद्र राजा असेल त्यावेळेस भरपूर प्रमाणात पाऊस पडतो. जर एखाद्या वर्षी मंगळग्रह राजा बनला तर फारच कमी पाऊस पडतो. जर गृह राजा बुध बनला तर जमीन ही कोरडी, नापिक बनते किंवा पाऊसच पडत नाही.जर गुरू राजा बनला तर चांगल्या पावयाची अपेक्षा असते. जर शुक्र राजा बनला तर शेतक–यांना विपुल पाऊस मिळतो आणि हे सातही ग्रह दरवर्षी हिंदू पंचागानुसार कोणता गृह राजा बनतो यावर पाराशर पावसाचे ज्योतिर्विद शेतक–यांना सांगतात. त्या त्या वर्षीच्या पर्जन्यनिदानाबारोबरच पाराशर इतर कल्पना काही गोष्टीही उघड करतात की ज्याचा संबंध माणसाच्या आजाराशी व इतर शकुनाशी जोडतात जर एखाद्या वर्षी सूर्य राजा असेल तर लोकांना डोळयाचा आजार होईल, तापाची लागण होईल इत्यादी. ज्यावेळी मंगळ ग्रह राजा बनतो त्यावेळी पिके नष्ट होतात. आरोग्याने लोक त्रस्त होतील. संपूर्ण वर्षभर सर्वांना त्रास होईल. कदाचित दुष्काळात सामोरे जावे लागेल. ज्यावेळी चंद्र राजा बनतो तेंव्हा जमीन सुपिक बनते. पिके मोठया प्रमाणात येतात आणि लोकांना चांगले आरोग्य लाभते. जेंव्हा बुध हा राजा बनतो तेंव्हा जमीन विपुल प्रमाणात पिकते. धरणीमाता मोठया प्रमाणावर पिकते. धरणीमाता मोठया प्रमाणावर धान्य धनराशी देते. लोकांना चांगले आरोग्य मिळते. ज्यावर्षी गुरू हा राजा बनतो त्यावर्षी धर्म किंवा विश्वास वाढण्यास सुरूवात होते. विपुल प्रमाणात पाऊस पडतो. भरपूर प्रमाणात धान्य निर्माण होते. सर्वत्र भरभराट होते. ज्यावर्षी शुक्र ग्रह हा राजा बनतो त्यावर्षी भरपूर प्रमाणात पावसाचे प्रमाण असल्याने आलेल्या धान्यामुळे धान्याची कोठारे भरली जाणार त्यामुळे विशिष्ट राष्ट्राचे राज्यकर्ते मालाची देवाण घेवाण करतील, पुढे पाराशर म्हणतात. ज्या वर्षी शनि हा राजा असेल त्या वर्षी राष्ट्रामध्ये अनावश्यक युध्द होतात. प्रचंड वादळं निर्माण होतात, पाऊस अत्यल्प असतो. लोक विविध आजाराने त्रस्त होतात. शेवटी पावसाचे व इतर शकुणाबाबत ज्योतिर्विद सांगताना म्हणतात, की वरील चरणात अधिपतित्व त्याला त्या वर्षीच्या हिंदू पंचागानुसार कथन केलेले आहे. लोकांनी त्या त्या वर्शी सर्व ग्रहाचे परिणाम दैवी मानून त्याला प्रत्येक ग्रहाचे (अधिपती) नेतृत्व मानले पाहिजे. ढगापासून धरत्रीला पाऊस मिळतो. तेथे पाराशरांनी ढगांचे सूक्ष्म अवलोकन केलेले आहे. पाराशर ढगांचे चार प्रकार मानतात. आवर्त, सामवर्त, पुष्कर आणि द्रोण असे ते ढगांचे प्रकार होत. हे चारही एकमेकापासून वेगळे आहेत. पाराशरांनी विविध ढगांचा पाऊस पडण्याचा नमुना सिध्द केला आहे. आवर्त ढग हे लहान भागात असतात. म्हणजे बहुतांशी भागाला पाऊस मिळत नाही किंवा फारच थोडा पाऊस मिळतो. सामवर्त ढगांमुळे संपूर्ण

धरत्रीवर पाऊस पडतो. पुष्कर या ढगामुळं पावसाचे प्रमाण फार थोडे असते. तर द्रोण ढगामुळे जास्तीत जास्त पाऊस पडतो.

पाराशर शेतक–यांना सल्लाही देतात की त्या त्या वर्षीच्या पडणा–या पावसाच्या शोधानुसार त्या वर्षी शेतक–यांनी जमिनीत बियांची पेरणी केलीच पाहिजे. पाराशर असेही म्हणतात की, पावसाची देवता ही इंद्र आहे. ही देवता मोठी कृपाळू आहे.

मृग नक्षत्रापासून पडणा–या पावसाचे निरीक्षण पाराशर यांनी केले आहे त्यावरून त्यांनी पावसाचे मूल्यमापन केले आहे. जर वर्षभरातील पडणारा पाऊस मोजला तर वीस भाग होतील. त्यातील दहा भाग पाऊस हा समुद्रावर सहा भाग पाऊस पर्वतावर आणि उरलेला चार भाग पाऊस हा जमिनीवर पडतो. पाराशर म्हणतात आपल्या पुर्वजांनी अर्थात तेंव्हाच्या विद्वानांनी त्या त्या महिन्यात पडणा–या पावसाची आणि वा–याची गती याचे निरीक्षण केले आहे. याचा उल्लेख हिंदू पंचागामध्ये केलेला आहे.भारतात पडणा–या पावसाचा आपल्याकडील वाहणा–या वा–याचा अनुभव हा दक्षिण पश्चिम तसेच दक्षिणपूर्व असा आहे. म्हणजेच आपल्याकडे जून पासून पावसाळा सुरू होतो.पाराशर वा–याच्या दिशेवरून पावसाचा अनुमान काढतात ते म्हणतात जर वारा हा उत्तर–पश्चिम दिशेने वाहत असेल तर पाऊस पडण्याची अपेक्षा असते. जर वारा हा दक्षिण–पुर्व वाहत असेल तर पाऊस येत नाही. असे दर्शविते आणि वारा शांत असेल तर पाऊस पडणार नाही आणि जर वारा खंडित स्वरूपात वाहत असेल तर पाऊस सुध्दा खंडी स्वरूपात येणार अशा स्वरूपाचे पाराशर वा'–याच्या वाहण्यावरून पावसाचे अनुमान करतात. पाराशर यांनी काही अनुमान येथे नमुद केलेले आहेत. तेंव्हा पौश महिन्यात विपुल प्रमाणात पाऊस पडत असे. जर शुक्लपक्षामधील धुळीच्या वादळाचे निरीक्षण केले तर वातावरण हे संपूर्ण ढगाळ बनते. सगळीकडे धुळ, विजांचा कडकडाट, मेघांच्या गर्जना अशा वेळेस जोरदार पाऊस होतो. दुस–या शकुनाबद्दल पाराशर सांगतात, जर पौश महिन्यात आकाश भरपूर ढगांनी भरलेले असेल तर शुक्ल पक्षाच्या काळात विपुल प्रमाणात पाऊस अपेक्षित असतो आणि चौथ्या शकुनाबद्दल चौथ्या शकुनाबद्दल पाराशर म्हणतात जर चंद्र हा मिन आणि वृश्चिक राशीत असतो तेंव्हा भरपूर पाऊस पडतो आणि पूरस्थिती निर्माण होते. हे सर्व अनुमान/ भकित पाराशर हे हिंदू वैदिक पंचागानुसार सांगतात. हा सर्व पावसाचा खेळ राशीभविश्यावर पंचागावर अवलंबून आहे असे पाराशरांचे मत आहे.

एकूणच मौखिक परंपरेप्रमाणेच लौकिक परंपरासुध्दा लोकमानसात प्रचलित आहे आणि लोकमानस या परंपरेकडे मोठया श्रध्देने बघतात. लोकज्योतिर्विद कला ही सुध्दा त्यातीलच एक आहे. भारतीय कृषिजीवन हे निसर्गावर अवलंबून आहे. म्हणूनच निसर्गाच्या पोटात काय दडलय हे जाणून घेण्याची सामान्य शेतक–याची जिज्ञासा असते. म्हणूनच तो कधी भेंडवळच्या कृशिमांडणीकडे वळतो, कधी सहदेव मांडणीसारख्या लौकिक पातळीवरील व्यक्तीच्या अनुभवजन्य ज्ञानाचे पाठबल घेतो. याचा एक भाग म्हणून पाचव्या–सहाव्या शतकातील संस्कृत ग्रंथ म्हणजे कृषिपाराशर होय. निसर्गावर अवलंबून असलेल्या शेतक–यासाठी पाराशरांनी या शेतक–याला आपल्या अभ्यास व निरीक्षणावरून पावसाविषयी काही शकून या पुस्तकात सांगितले आहेत हे सर्व अनुमान त्यांनी हिंदू वैदिक पंचागानुसार सांगितले आहेत, काही ठिकाणी त्यांनी ढगांचे, वा–यांचे निरीक्षण सुध्दा केलेले आहे. पाराशरांच्या एकूणच वेदशास्त्राचा अभ्यास आणि निरीक्षण यातून कृषि पाराशरा हा ग्रंथ सिध्द झाला आहे. मूळ पुस्तक दीर्घ स्वरूपात असून ते संस्कृत भाषेत आहे. वेबसाईटवर त्याचे काही इंग्रजीत अनुवाद आहेत.

***संदर्भ*** –

1.मधुकर वाकोडे – लोकधाटीच्या वहिवाटी, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती 2005.
2.स.रा. गाडगीळ– लोकायन, लोकवाड्.मय गृह मुंबई, चौथी आवृत्ती 2005
3.कृषिपाराशरा.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net